# कार्यकारी सारांश

## अ) पुर्वपीठीका :-

मा. आयोगाने आ.व. २०२०-२०२१ ते आ.व. २०२४-२५ या चतुर्थ नियंत्रण कालावधी करिता, बहुवर्षिय वीज दर विनियम २०१९, दि. ०१.०८.२०१९ रोजी पारित केले. सदर विनियमाच्या तरतुद क्र. ५.१ (ब) नुसार, वितरण परवाना धारकाने मध्यावधी आढावा याचिका (एम. टी. आर याचिका) दि. ३०.११.२०२२ पर्यंत दाखल करणे अपेक्षित होते. त्यानुसार महावितरण तर्फे बहुवर्षिय वीजदर विनिमय २०१९ नुसार मध्यावधी आढावा याचिका सादर करण्यात येत आहे.

महावितरण विद्युत अधिनियम २००३ चे कलम ६२ व महाराष्ट्र वीजदर नियामक आयोग (म.वि.नि.आ.) (बहुवर्षिय वीज दर) विनियम, २०१९ मधील तरतूदी नुसार मध्यावधी आढावा याचिकेमध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

- महाराष्ट्र वीजदर नियामक आयोग (बहुवर्षिय वीजदर) विनियम, २०१५ अंतर्गत वार्षिक लेखांकनावर आधारित आ.व. २०१९-२० चे अंतिम अचुक समायोजन ;
- महाराष्ट्र वीजदर नियामक आयोग (बहुवर्षिय वीजदर) विनियम, २०१९ अंतर्गत वार्षिक लेखांकनावर आधारित आ.व. २०२०-२१ व २०२१-२२ चे अंतिम अचुक समायोजन;
- महाराष्ट्र वीजदर नियामक आयोग (बहुवर्षिय वीजदर) विनियम, २०१९ अंतर्गत उपलब्ध माहिती वर आधारित आ.व. २०२२-२३ चे तात्पुरते समायोजन;
- महाराष्ट्र वीजदर नियामक आयोग (बहुवर्षिय वीजदर) विनियम, २०१९ अंतर्गत आ. व. २०२३-२४ ते आ.व. २०२४-२५ साठी एकूण महसुली गरज, सध्याचे वीजदर व शुल्क यातून अपेक्षित महसुल, अपेक्षित महसुलातील तुट आणि प्रस्तावित वर्गवारी निहाय वीजदर यांचा सुधारित अंदाज;
- आकार पत्रकाचे (शेडयुल ऑफ चार्जेस) पुनरावलोकन.

## ब) आ.व. २०१९-२० चे अंतिम अचुक समायोजन :-

आर्थिक वर्ष २०१९-२० च्या पुर्नविचारीत वार्षिक लेखापरिक्षित अहवालावर आधारीत आ.व. २०१९-२० ची एकूण महसुली गरज रु. **८६००४.२८** कोटी इतकी असून त्याचे सविस्तर विवेचन खालील तक्त्यात नमूद केले आहे. मा. आयोगाने प्र.क्र. ३२२/२०१९ मधील दि. ३०.०३.२०२० रोजीच्या बहुवर्षिय वीजदर याचिकेच्या आदेशान्वये आ.व. २०१९-२० साठी मान्यता दिलेल्या एकूण महसुलाच्या गरजे बरोबर आ.व. २०१९-२० साठीच्या प्रत्यक्ष खर्चाची तुलना खालील तक्यात दर्शविण्यात येत आहे

**रु. कोटी मध्ये**

| तपशील | आ.व. २०१९-२० मंजुर | आ.व. २०१९-२० प्रत्यक्ष | तफावत |
|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ५५,९६७.६२ | ६१,८९७.२२ | ५,९२९.६० |
| संचलन व सुव्यवस्थेवरील खर्च | ७,४६३.७६ | ७,५१७.९७ | ५४.२२ |
| घसारा खर्च | २,६६५.५३ | २,४३८.०३ | (२२७.५०) |
| कर्ज भांडवला वरील व्याज | १,३२८.८८ | १,२७४.३४ | (५४.५४) |
| खेळत्या भांडवला वरील व्याज | १३५.७७ | १३१.४० | (४.३७) |
| ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ७९६.०३ | ७४८.९२ | (४७.११) |
| इतर वित्तीय आकार | ३१.१० | २२.०८ | (९.०२) |

| तपशील | आ.व. २०१९-२० मंजुर | आ.व. २०१९-२० प्रत्यक्ष | तफावत |
|---|---|---|---|
| बुडीत व साशंक रक्कमेसाठीची तरतुद | ७३२.६३ | ८५४.९६ | १२२.३३ |
| अन्य खर्च | ५०.०८ | ८३.२८ | ३३.२० |
| प्राप्ती कर | २१३.८९ | - | (२१३.८९) |
| पारेषण अनुज्ञप्तीधारकांस प्रदान केलेला पारेषण आकार व म.रा.भार प्रेषण केंद्राचे शुल्क तथा आकार | ४,८६७.५५ | ४,८७१.२५ | ३.७० |
| प्रोत्साहन /सवलत | ३०७.०३ | ३३७.२५ | ३०.२२ |
| आकस्मिक राखीव निधीचे योगदान | १४२.७६ | १२८.१९ | (१४.५७) |
| भाग भांडवलावरील परतावा | १,८६६.७९ | १,८९३.४३ | २६.६४ |
| नियामक दायित्व आकाराचा परतावा | १.८४ | १.७७ | (०.०६) |
| नफा/तोटा वितरणाचा परिणाम खर्च | - | ३४७.७६ | ३४७.७६ |
| आयोगाद्वारे मागील कालावधीसाठीचे समायोजन | ८५३.०८ | ८५३.०८ | - |
| महसुली तुट मान्य | २,५६२.९३ | २,५६२.९३ | - |
| अधिक : पुढील वर्षांसाठी MPECS ला केलेल्या प्रदानाचा परिणाम | ४०.१७ | ४०.४२ | ०.२५ |
| **महसुली गरज** | **८०,०२७.४३** | **८६,००४.२८** | **५,९७६.८५** |
| बहुवर्षिय वीजदर आदेशानुसार स्थिरीकरण रक्कम | - | - | - |
| **एकूण महसुली गरज** | **८०,०२७.४३** | **८६,००४.२८** | **५,९७६.८५** |
| वजा | | | |
| वीजदरां व्यतिरिक्त उत्पन्न | ३६१.६६ | ४९४.१९ | १३२.५२ |
| ओपन ॲक्सेस चार्जेस पासुनचे उत्पन्न | २९.५९ | ८३.४४ | ५३.८५ |
| अतिरिक्त वीज विक्रीतून मिळणारा महसुल | २९८.१८ | ३३५.९९ | ३७.८१ |
| वहन आकारातून मिळणारे उत्पन्न | १.७९ | १.१० | (०.६८) |
| अतिरीक्त अधिभारातून मिळणारे उत्पन्न | ३१७.१४ | ५७५.६० | २५८.४६ |
| **एकूण महसुल** | **७९०१९.०७** | **८४,५१३.९६** | **५,४९४.८९** |
| वीज विक्रीतून मिळणारा एकुण महसुल | ७८,९६५.३० | ७२,९४४.५५ | (६,०२०.७५) |
| ठोक वीज पुरवठा मिळणारा एकुण महसुल | - | - | - |
| वायर व्यवसायतून मिळणारा एकुण महसुल | - | - | - |
| **महसुलातील तुट / (आधिक्य)** | **५३.७७** | **११,५६९.४०** | **११,५१५.६४** |

कायदा बदलामुळे (Change in Law) देय असलेली रक्कम, महानिर्मिती व पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन इंडिया लि. यांच्या खर्चातील वाढ, नॅशनल पॉवर कॉर्पोरेशन इंडिया लि. यांच्या दरातील वाढीमूळे झालेल्या विज खरेदी खर्चातील वाढ आणि मा. आयोगाने मंजूर केलेल्या सबसिडायझिंग वर्गवारीतील वीज विक्री मधून प्राप्त झालेल्या महसूलातील घट ही तफावतीची मुख्य कारणे आहेत.

महावितरण येथे नमुद करु इच्छिते की, आ.व. २०१९-२० च्या तात्पुरते समायोजनावेळी महावितरणने प्रस्तावित संख्या सादर केली होती. तद्नंतर सदर वर्षाकरीताचे लेखा परिक्षण झाल्यामुळे, महावितरण अंतिम समायोजन लेखा परिक्षणच्या आधारे सादर करीत आहे.

**क) आ. व. २०२०-२०२१ चे अंतिम अचुक समायोजन :-**

आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या पुर्नविचारीत वार्षिक लेखापरिक्षित अहवालावर आधारीत आ.व. २०२०-२१ ची एकूण महसुली गरज रु. **८०,३७६.७२** कोटी इतकी असून त्याचे सविस्तर विवेचन खालील तक्त्यात नमूद केले आहे. मा. आयोगाने प्र.क्र.

३२२/२०१९ मधील, दि. ३०.०३.२०२० रोजीच्या बहुवर्षिय वीजदर याचिकेच्या आदेशान्वये आ.व. २०२०-२१ साठी मान्यता दिलेल्या एकूण महसुलाच्या गरजे बरोबर आ.व. २०२०-२१ साठीच्या प्रत्यक्ष खर्चाची तुलना खालील तक्यात दर्शविण्यात येत आहे.

**रु. कोटी मध्ये**

| **तपशील** | **आ.व. २०२०-२१ मंजुर** | **आ.व. २०२०-२१ प्रत्यक्ष** | **तफावत** |
|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ५९,१२६.०६ | ५६,२८९.२५ | (२,८३६.८०) |
| संचलन व सुव्यवस्थेवरील खर्च | ७,५७१.८१ | ७,४९८.०७ | (७३.७५) |
| घसारा खर्च | २,८१७.९१ | २,६५४.१८ | (१६३.७४) |
| कर्ज भांडवला वरील व्याज | १,३२०.८६ | १,१७९.८४ | (१४१.०२) |
| खेळत्या भांडवला वरील व्याज | १४०.९६ | २,४४१.१२ | २,३००.१६ |
| ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ५४०.५८ | २८२.७० | (२५७.८९) |
| इतर वित्तीय आकार | - | ३२.१९ | ३२.१९ |
| बुडीत व साशंक रक्कमेसाठीची तरतुद | ७३२.६३ | ४६५.०५ | (२६७.५८) |
| अन्य खर्च | ५२.५८ | ११३.७० | ६१.१२ |
| प्राप्ती कर | - | - | - |
| पारेषण अनुज्ञप्तीधारकांस प्रदान केलेला पारेषण आकार व म.रा.भार प्रेषण केंद्राचे शुल्क तथा आकार | ५,६९९.९२ | ५,७१५.७४ | १५.८२ |
| प्रोत्साहन /सवलत | ३२२.३८ | ३०७.४० | (१४.९८) |
| आकस्मिक राखीव निधीचे योगदान | १५७.५६ | १५७.५६ | (०.००) |
| ओपेक्स योजना | ११०.४९ | २७.०५ | (८३.४४) |
| भाग भांडवलावरील परतावा | २,१०९.५८ | १,९९०.८७ | (११८.७०) |
| नफा/तोटा वितरणाचा परिणाम खर्च | - | ९२.८१ | ९२.८१ |
| अधिक : पुढील वर्षांसाठी MPECS ला केलेल्या प्रदानाचा परिणाम देयक परिणाम | ३७.१६ | ३७.४१ | ०.२५ |
| वाढीव वापरासाठी सवलत | ४३९.६६ | ३३६.८० | (१०२.८६) |
| **महसुली गरज** | **८१,१८०.१५** | **७९,६२१.७२** | **(१,५५८.४३)** |
| बहुवर्षिय वीजदर आदेशानुसार स्थिरीकरण रक्कम | ७५५.०० | ७५५.०० | - |
| **निव्वळ एकूण महसुली गरज** | **८१,९३५.१५** | **८०,३७६.७२** | **(१,५५८.४३)** |
| वजा | | | |
| वीजदरां व्यतिरिक्त उत्पन्न | ३७९.७५ | ३१६.८५ | (६२.९०) |
| ओपन ॲक्सेस चार्जेस पासुनचे उत्पन्न | २१५.७१ | २१३.०७ | (२.६५) |
| अतिरिक्त वीज विक्रीतून मिळणारा महसुल | ३०२.०५ | १२६.२१ | (१७५.८४) |
| वहन आकारातून मिळणारे उत्पन्न | - | ०.०९ | ०.०९ |
| अतिरीक्त अधिभारातून मिळणारे उत्पन्न | ११९.६५ | ४७९.०३ | ३५९.३९ |
| **निव्वळ एकूण महसुल गरज** | **८०,९१८.००** | **७९,२४१.४७** | **(१,६७६.५३)** |
| वीज विक्रीतून मिळणारा एकुण महसुल | ८०,९१८.०० | ७३,३०९.०४ | (७,६०८.९६) |
| ठोक वीज पुरवठा मिळणारा एकुण महसुल | - | - | - |
| वायर व्यवसायतून मिळणारा एकुण महसुल | - | - | - |
| **महसुलातील तुट / (आधिक्य)** | **(०.००)** | **५,९३२.४३** | **५,९३२.४३** |

कायदा बदलामुळे (Change in Law) देय असलेली रक्कम, महानिर्मिती व पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन इंडिया लि. यांच्या खर्चातील वाढ, नॅशनल पॉवर कॉर्पोरेशन इंडिया लि. यांच्या दरातील वाढीमूळे झालेल्या विज खरेदी खर्चातील वाढ आणि मा.

आयोगाने मंजूर केलेल्या सबसिडायझिंग वर्गवारीतील वीज विक्री मधून प्राप्त झालेल्या महसूलातील घट ही तफावतीची मुख्य कारणे आहेत.

महावितरण येथे नमुद करु इच्छिते की, आ.व. २०२०-२१ च्या तात्पुरते समायोजनावेळी महावितरणने प्रस्तावित संख्या सादर केली होती. तद्‌नंतर सदर वर्षाकरीताचे लेखा परिक्षण झाल्यामुळे, महावितरण अंतिम समायोजन लेखा परिक्षणच्या आधारे सादर करीत आहे.

**ड) आ.व. २०२१-२२ चे अंतिम अचुक समायोजन :-**

आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या वार्षिक लेखापरिक्षित अहवालावर आधारीत आ.व. २०२१-२२ ची एकूण महसुली गरज रु. **९५,९९०.९५** कोटी इतकी असून त्याचे सविस्तर विवेचन खालील तक्त्यात नमूद केले आहे. मा. आयोगाने प्र.क्र. ३२२/२०१९ मधील, दि. ३०.०३.२०२० रोजीच्या बहुवर्षिय वीजदर याचिकेच्या आदेशान्वये आ.व. २०२१-२२ साठी मान्यता दिलेल्या एकूण महसुलाच्या गरजे बरोबर आ.व. २०२१-२२ साठीच्या प्रत्यक्ष खर्चाची तुलना खालील तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

**रु. कोटी मध्ये**

| तपशील | आ.व. २०२१-२२ मंजुर | आ.व. २०२१-२२ प्रत्यक्ष | तफावत |
|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ६०,५६८.९२ | ६९,४७८.७८ | ८,९०९.८६ |
| संचलन व सुव्यवस्थेवरील खर्च | ७,२५७.६९ | ७,९४९.७९ | ६९२.११ |
| घसारा खर्च | २,९६३.९७ | २,८८०.५० | (८३.४७) |
| कर्ज भांडवलावारील व्याज | १,२७५.५९ | १,०५८.७९ | (२१६.८) |
| खेळत्या भांडवलावारील व्याज | १४२.७१ | १२३.०८ | (१९.६३) |
| ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ५६७.६१ | ३६०.३८ | (२०७.२३) |
| अन्य वित्त खर्च | - | ४५.४७ | ४५.४७ |
| बुडीत व साशंक रक्कमेसाठीची तरतुद | ७३२.६३ | ४५९.६२ | (२७३.०१) |
| अन्य खर्च | ५५.२१ | ६५५.४ | ६००.१९ |
| प्राप्ती कर | - | - | - |
| पारेषण अनुज्ञप्तीधारकांस प्रदान केलेला पारेषण आकार व म.रा.भार प्रेषण केंद्राचे शुल्क तथा आकार | ५,८०९.२५ | ५,९७७.८३ | १६८.५९ |
| प्रोत्साहन /सवलत | ३३८.५० | ३६७.३७ | २८.८७ |
| आकस्मिक राखीव निधीचे योगदान | १७१.०२ | १७१.०२ | (०.००) |
| ओपेक्स योजना | ११०.४९ | ३१.६७ | (७८.८२) |
| भाग भांडवलावरील परतावा | २,१९५.१८ | २,१२२.३२ | (७२.८६) |
| नियामक दायित्व आकाराचा परतावा | - | - | - |
| अतिरिक्त भांडवलाचा परतावा | | १२.२७ | १२.२७ |
| नफा/तोटा वितरणाचा परिणाम | | १,०३६.८२ | १,०३६.८२ |
| अधिक : पुढील वर्षांसाठी MPECS ला केलेल्या प्रदानाचा परिणाम | ३४.१५ | ३४.४ | ०.२५ |
| वाढीव आकारासाठी सवलत | ५४८.५० | ५४६.४४ | (२.०६) |
| **एकूण महसुली गरज** | **८२,७७१.४३** | **९३,३११.९५** | **१०,५४०.५५** |
| बहुवर्षिय वीजदर आदेशानुसार स्थिरीकरण रक्कम | २,६७९.०० | २,६७९.०० | - |
| **निव्वळ एकूण महसुली गरज** | **८५,४५०.४३** | **९५,९९०.९५** | **१०,५४०.५२** |
| **वजा** | | | |
| वीजदरां व्यतिरिक्त उत्पन्न | ३९८.७३ | १,२०८.३७ | ८०९.६३ |
| ओपन ॲक्सेस चार्जेस पासुनचे उत्पन्न | २१४.९२ | १२९.९२ | (८५.००) |
| अतिरिक्त वीज विक्रीतून मिळणारा महसुल | ३१९.७५ | १९५.९३ | (१२३.८३) |
| वहन आकारातून मिळणारे उत्पन्न | - | ०.०४ | ०.०४ |

| तपशील | आ.व. २०२१-२२ मंजुर | आ.व. २०२१-२२ प्रत्यक्ष | तफावत |
|---|---|---|---|
| अतिरिक्त अधिभारातून मिळणारे उत्पन्न | ११७.२८ | ४०२.६२ | २८५.३३ |
| **निव्वळ एकूण महसुली गरज** | **८४,३९९.७३** | **९४,०५४.०८** | **९,६५४.३५** |
| वीज विक्रीतून मिळणारा एकुण महसुल | ८४,४००.०० | ८५,९०३.२८ | १,५०३.२८ |
| ठोक वीज पुरवठा मिळणारा एकुण महसुल | - | - | - |
| वायर व्यवसायतून मिळणारा एकुण महसुल | - | - | - |
| **महसुलातील तुट / (आधिक्य)** | **(०.२७)** | **८,१५०.८०** | **८,१५१.०७** |

वाढीव वीज विक्रीमुळे वीज खरेदी खर्चातील झालेली वाढ आणि घरगुती कोळशाच्या टंचाई अभावी वीजखरेदी खर्चात झालेली वाढ, गणना करुन आलेले संचलन व सुव्यवस्थेवरील खर्चात झालेली वाढ ही तफावती ची प्रमुख कारणे आहेत. महावितरण नमुद करते की सदर तफ़ावत ही महावितरणच्या नियंत्रणाबाहेरील घटकांमुळे आहे.

### इ) आ. व. २०२२-२३ चे तात्पुरते समायोजन :-

आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी ची एकुण महसुली गरज ही पहिल्या सहा महिन्या पर्यंत तात्पुरत्या उपलब्ध असणाऱ्या आकडेवारीवर आधारभूत असून, उर्वरित ६ महिन्यांकरिता प्रस्तावित केलेल्या आकडेवारी लक्षात घेऊन करण्यात आलेली आहे.

आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या वार्षिक लेखापरिक्षित अहवालावर आधारीत आ.व. २०२२-२३ ची एकूण महसुली गरज रु. **१,००,६५४.१२** कोटी इतकी असून त्याचे सविस्तर विवेचन खालील तक्त्यात नमूद केले आहे. मा. आयोगाने प्र.क्र. ३२२/२०१९ मधील, दि. ३०.०३.२०२० रोजीच्या बहुवर्षिय वीजदर याचिकेच्या आदेशान्वये आ.व. २०२२-२३ साठी मान्यता दिलेल्या एकूण महसुलाच्या गरजे बरोबर आ.व. २०२२-२३ साठीच्या अनुमाणित खर्चाची तुलना खालील तक्यात दर्शविण्यात येत आहे.

**रु. कोटी मध्ये**

| तपशील | आ.व. २०२२-२३ मंजुर | आ.व. २०२२-२३ अदांजे | तफावत |
|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | ६२,३३७.५७ | ७३,५२९.४९ | ११,१९१.९२ |
| संचलन व सुव्यवस्थेवरील खर्च | ७,५३५.९४ | ७,९७९.०२ | ४४३.०८ |
| घसारा खर्च | ३,०६०.७६ | २,९६८.७९ | (९१.९७) |
| कर्ज भांडवला वरील व्याज | १,१२१.९४ | ९२९.९५ | (१९१.९८) |
| खेळत्या भांडवला वरील व्याज | १४५.५८ | १२७.८९ | (१७.६८) |
| ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ५९५.९९ | ४३८.०९ | (१५७.९०) |
| अन्य वित्त खर्च | - | - | - |
| बुडीत व साशंक रक्कमेसाठीची तरतुद | ७३२.६३ | १,०५९.६३ | ३२७.०० |
| अन्य खर्च | ५७.९७ | ३१४.१० | २५६.१३ |
| प्राप्ती कर | - | - | - |
| पारेषण अनुज्ञप्तीधारकांस प्रदान केलेला पारेषण आकार व म.रा.भार प्रेषण केंद्राचे शुल्क तथा आकार | ५,९१५.०७ | ५,९१५.०७ | - |
| प्रोत्साहन /सवलत | ३५५.४३ | ३६७.३७ | ११.९४ |
| आकस्मिक राखीव निधीचे योगदान | १८०.१२ | ९०.०६ | (९०.०६) |
| ओपेक्स योजना | ११०.४९ | ९०.२० | (२०.२९) |
| भाग भांडवलावरील परतावा | २,२७०.२० | १,९५३.६७ | (३१६.५३) |
| अतिरिक्त भांडवलाचा परतावा | | १८०.०० | १८०.०० |
| नफा/तोटा वितरणाचा परिणाम | - | - | - |
| अधिक : पुढील वर्षांसाठी MPECS ला केलेल्या प्रदानाचा परिणाम | ३१.१४ | ३१.१४ | - |
| वाढीव आकारासाठी सवलत | ६६१.६५ | ६६१.६५ | - |
| **एकूण महसुली गरज** | **८५,११२.४८** | **९६,६३६.१२** | **११,५२३.६४** |

| तपशील | आ.व. २०२२-२३ मंजुर | आ.व. २०२२-२३ अदांजे | तफावत |
|---|---|---|---|
| बहुवर्षिय वीजदर आदेशानुसार स्थिरीकरण रक्कम | ४,०१८.०० | ४,०१८.०० | - |
| **निव्वळ एकूण महसुली गरज** | **८९,१३०.४८** | **१,००,६५४.१२** | **११,५२३.६४** |
| वजा | | | |
| वीजदरां व्यतिरिक्त उत्पन्न | ४१८.६७ | ३१७.९६ | (१००.७१) |
| ओपन ॲक्सेस चार्जेस पासुनचे उत्पन्न | २१६.६९ | २१६.६९ | - |
| अतिरिक्त वीज विक्रीतून मिळणारा महसुल | ३४०.९६ | १७५.४९ | (१६५.४७) |
| वहन आकारातून मिळणारे उत्पन्न | - | - | - |
| अतिरिक्त अधिभारातून मिळणारे उत्पन्न | ११५.५२ | ११५.५२ | - |
| **निव्वळ एकूण महसुली गरज** | **८८,०३८.६५** | **९९,८२८.४७** | **११,७८९.८२** |
| वीज विक्रीतून मिळणारा एकुण महसुल | **८८,०३९.००** | **९९,२८०.७८** | **११,२४१.७८** |
| ठोक वीज पुरवठा मिळणारा एकुण महसुल | - | - | - |
| वायर व्यवसायतून मिळणारा एकुण महसुल | - | - | - |
| **महसुलातील तुट / (आधिक्य)** | **(०.३५)** | **५४७.६९** | **५४८.०३** |

वाढीव वीज विक्रीमुळे वीज खरेदी खर्चातील झालेली वाढ ग्राहक मिश्रणातील झालेल्या बदलामुळे वीज विक्रीद्वारे येणाऱ्या महसूलातील बदल आणि कॅपेक्सशी निगडीत खर्चामध्ये झालेली वाढ ही तफावतीची प्रमुख कारणे आहेत. महावितरण नमुद करते की सदर तफ़ावत ही महावितरणच्या नियंत्रणाबाहेरील घटकांमुळे आहे.

**फ) आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एकुण महसुलाची गरज :-**

आ.व. २०२३-२४ ते आ.व. २०२४-२५ या कालावधीकरीता एकुण महसुलाची गरज, विद्यमान वीजदरातून मिळणारा अपेक्षित महसुल आणि महसुलातील अपेक्षित तफावत यांचा सुधारित अंदाज हा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षिय वीजदर) विनिमय २०१९ च्या तरतुदी आणि काही गृहितकांच्या आधारे केला गेला आहे.

**१) वीज विक्रीचा अंदाज :-**

महावितरणने ऐतिहासिक कल पध्दतीचा वापर करुन एकत्रित वार्षिक वृध्दिदर लक्षात घेऊन विविध वर्गवारीतील ग्राहकांचा उर्जा वापर अंदाजित केला आहे. जिथे ऐतिहासिक कल अवास्तव / अयोग्य असल्याचे लक्षात आले तिथे आणखी वास्तववादी अंदाजाच्या नजिक जाण्यासाठी वृध्दी दरामध्ये दुरुस्ती करण्यात आली.

वर्गवारी निहाय एकत्रित वार्षिक वृध्दीदर व वीज विक्री लक्षात घेऊन महावितरणने आ.व. २०२३-२४ ते आ.व. २०२४-२५ ची वीज विक्री अंदाजित केलेली आहे. उच्चदाब वर्गवारीसाठी वीज विक्रीचा अंदाज खालील तक्त्यात नमूद केला आहे.

**द.ल.यु.**

| वर्गवारी | आ.व. २०२३-२४ मंजुर | आ.व. २०२३-२४ प्रस्तावित | आ.व. २०२४-२५ मंजुर | आ.व. २०२४-२५ प्रस्तावित |
|---|---|---|---|---|
| उच्चदाब-१ औद्योगिक | ३७,७५७ | ३७,९०१ | ३९,२६३ | ३९,०३८ |
| उच्चदाब-२ वाणिज्यिक | १,९७४ | १,७९२ | २,०१५ | १,८२८ |
| उच्चदाब-३ रेल्वे | ८५ | ११२ | ८७ | ११६ |
| उच्चदाब-४ सार्वजनिक पाणी पुरवठा | १,७९१ | १,८६३ | १,८३६ | १,९१९ |
| उच्चदाब-५ कृषी | १,३६५ | ८९६ | १,४०८ | ९०६ |
| उच्चदाब-६ एकगठ्ठा पुरवठा (गृहनिर्माण संकुल) | २४५ | २४४ | २४७ | २४४ |
| उच्चदाब तात्पुरता पुरवठा | ६ | - | ६ | - |
| उच्चदाब-९ सार्वजनिक सेवा | १,२५७ | १,२०४ | १,३१५ | १,२२७ |
| महानिर्मिती सहाय्यकारी पुरवठा | १८४ | २९५ | १८४ | २९५ |
| उच्चदाब कृषी इतर (पोल्ट्री) | २८५ | २८३ | २९४ | २८३ |
| उच्चदाब विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन ११ के.व्ही. | - | ५ | - | ६ |
| उच्चदाब विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन २२ के.व्ही. | ० | ५३ | ० | ५८ |
| **एकूण उच्चदाब विक्री** | **४४,९४९** | **४४,६४८** | **४६,६५५** | **४५,९१९** |

**लघुदाब वर्गवारीसाठी वीजविक्रीचा अंदाज खालील तक्त्यात नमुद केला आहे.**

**द.ल.यु.**

| | आ.व. २०२३-२४ | आ.व. २०२३-२४ | आ.व. २०२४-२५ | आ.व. २०२४-२५ |
|---|---|---|---|---|
| | मंजुर | प्रस्तावित | मंजुर | प्रस्तावित |
| **लघुदाब वर्गवारी** | | | | |
| लघुदाब १ घरगुती बीपीएल | ५२ | ५७ | ५५ | ६० |
| लघुदाब १ घरगुती | २६,०७० | २६,४०६ | २७,३४० | २७,१९९ |
| लघुदाब २ बिगर घरगुती | ८,५६५ | ६,१९६ | ९,२७४ | ६,४४४ |
| लघुदाब ३ सार्वजनिक पाणी पुरवठा | १,०४७ | ९२० | १,१०६ | ९७० |
| लघुदाब ४ कृषीपंप | २८,०६७ | ३४,३६९ | २८,६२६ | ३५,३०८ |
| लघुदाब ५ यंत्रमाग | २,४९६ | १,८९५ | २,६१६ | १,९५२ |
| लघुदाब ५ औद्योगिक इतर | ६,१६४ | ७,४८७ | ६,४६२ | ७,७१२ |
| लघुदाब ६ पथदिवे | २,७१९ | १,०५२ | २,८९२ | १,०५२ |
| लघुदाब ७- तात्पुरता पुरवठा | २४ | - | २४ | - |
| लघुदाब-८ जाहिराती आणि प्रसिध्दी फलकज | ६ | - | ६ | - |
| लघुदाब ९ - स्मशानभुमी व दफनभुमी | २ | - | २ | - |
| लघुदाब १० - सार्वजनिक सेवा | ६८३ | ७५४ | ७२८ | ७९५ |
| लघुदाब विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन | ० | २ | ० | २ |
| **एकूण लघुदाब** | **७५,८९४** | **७९,१३९** | **७९,१३०** | **८१,४९४** |
| **एकूण वीज विक्री** | **१,२०,८४३** | **१,२३,७८७** | **१,२५,७८५** | **१,२७,४१३** |

**२. वीज खरेदी :-**

महावितरणने आ. व. २०२३-२४ ते आ. व. २०२४-२५ साठीची वीज खरेदी ही वीजेची उपलब्धता, संचलन मापदंड, आगामी प्रकल्पाचे अपेक्षित कार्यान्वयन आणि आ. व. २०२३-२४ ते आ. व. २०२४-२५ या कालावधीतील जुन्या संचांचे अकार्यान्वयन इत्यादी बाबींच्या आधारे प्रस्तावित केली आहे. वीजखरेदी खर्च हा मेरीट ऑर्डर डिस्पॅच (MOD) तत्वावर आधारीत केलेला आहे. आ. व. २०२३-२४ ते आ. व. २०२४-२५ या कालावधीसाठी स्त्रोतनिहाय प्रस्तावित वीज खरेदीचा सारांश खालील प्रमाणे आहे

**आ. व. २०२३ -२४**

| स्त्रोत | वीज खरेदी मात्रा (द.ल.यु) | | | वीज खरेदी खर्च (रु.कोटी ) | | | वीज खरेदी खर्च (रु./युनिट) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बहुवर्षिय वीजदर आदेशात मंजुर केल्याप्रमाणे | प्रस्तावित | तफावत | बहुवर्षिय वीजदर आदेशात मंजुर केल्याप्रमाणे | प्रस्तावित | तफावत | बहुवर्षिय वीजदर आदेशात मंजुर केल्याप्रमाणे | प्रस्तावित | तफावत |
| महानिर्मिती | ५१,३५१ | ६२,३३२.५७ | १०,९८१.६३ | २२,२०६ | २९,६४९.०२ | ७,४४३.४२ | ४.३२ | ४.७६ | ०.४३ |
| एनटीपीसी | २८,३४४ | २९,६३२.५६ | १२,८८.५२ | ११,३६८ | १२,२३९.१५ | ८७१.४१ | ४.०१ | ४.१३ | ०.१२ |
| एनपीसीआयएल | ४,९४६ | ४,३७२.५२ | (५७३.२२) | १,५१५ | १,३८९.४० | (१२५.८६) | ३.०६ | ३.१८ | ०.११ |
| एसएसपी | १,२१३ | ४५१.६६ | (७६१.३४) | २४९ | ९२.६० | (१५६.४०) | २.०५ | २.०५ | (०.००) |
| पेंच | १३७ | ९६.७५ | (४०.२५) | २८ | १९.८३ | (८.१७) | २.०४ | २.०५ | ०.०१ |
| सुभानसरी | | ३२१.९३ | ३२१.९३ | | १४४.८७ | १४४.८७ | | ४.५० | ४.५० |
| डॉडसन | ११६ | ३१.७८ | (८४.२२) | २८ | १९.९० | (७.८५) | २.३९ | ६.२६ | ३.८७ |
| जेएसडब्ल्यू | १,४६२ | | (१,४६२.४७) | ६६३ | १६४.६७ | (४९८.३३) | ४.५३ | | (४.५३) |
| सीजीपीएल | ५,१७२ | ४६९४.४८ | (४७७.५४) | १,६८५ | २,६६६.४३ | ९८१.४३ | ३.२६ | ५.६८ | २.४२ |
| अदानी पॉवर | २१,०४४ | १२,१६९.०८ | (८,८७४.७९) | ८,२४६ | ७,९७५.८५ | (२७०.१५) | ३.९२ | ६.५५ | २.६४ |
| एमको पॉवर | १,३७४ | १,४९३.२८ | ११९.४६ | ७१७ | ६२०.९८ | (९५.५२) | ५.२२ | ४.१६ | (१.०६) |
| रतन इंडिया | १,९२१ | ८,९५९.६८ | ७,०३८.८७ | १,४२४ | ३,६४२.७१ | २,२१९.११ | ७.४१ | ४.०७ | (३.३५) |
| साई वर्धा | | १,७९१.९४ | १,७९१.९४ | | ८३८.२९ | ८३८.२९ | | ४.६८ | ४.६८ |
| नुतनशील | ३१,६७९ | २६,४०८.९६ | (५,२७०.२३) | १२,५८३ | ११,८५९.३७ | (७२३.२३) | ३.९७ | ४.४९ | ०.५२ |
| व्यापारी | | - | - | | - | - | | | - |
| पीजीसीआयएल शुल्क | | ० | - | ३,८४५ | ३,८४५.०१ | ०.०१ | | | - |
| **एकूण वीज खरेदी** | **१,४८,७५९** | **१,५२,७५७** | **३,९९८** | **६४,५५५.०५** | **७५,१६८.०९** | **१०,६१३.०४** | **४.३४** | **४.९२** | **०.५८** |

**आ. व. २०२४-२५**

| स्त्रोत | वीज खरेदी मात्रा (द.ल.यु) | | | वीज खरेदी खर्च (रु.कोटी ) | | | वीज खरेदी खर्च (रु./युनिट) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बहुवर्षिय वीजदर आदेशात मंजुर केल्याप्रमाणे | प्रस्तावित | तफावत | बहुवर्षिय वीजदर आदेशात मंजुर केल्याप्रमाणे | प्रस्तावित | तफावत | बहुवर्षिय वीजदर आदेशात मंजुर केल्याप्रमाणे | प्रस्तावित | तफावत |
| महानिर्मिती | ५१,४०९ | ६५,६५५.९९ | १४,२४६.८६ | २२,५१६ | ३१,९२४.५८ | ९,४०८.९९ | ४.३८ | ४.८६ | ०.४८ |
| एनटीपीसी | २८,२९२ | २८,७५९.९६ | ४६७.७३ | ११,५८२ | १२,१४५.९६ | ५६४.३४ | ४.०९ | ४.२२ | ०.१३ |
| एनपीसीआयएल | ४,९३२ | ४,९३२.४३ | ०.२० | १,५४८ | १,६१४.५० | ६६.८१ | ३.१४ | ३.२७ | ०.१४ |
| एसएसपी | १,२१० | ४५०.८२ | (७५९.१२) | २४८ | ९२.४३ | (१५५.५७) | २.०५ | २.०५ | ०.०० |
| पेंच | १३७ | ९६.५५ | (३९.९५) | २८ | १९.७९ | (८.२१) | २.०५ | २.०५ | (०.००) |
| सुभानसरी | | ३२१.१२ | ३२१.१२ | | १४४.५१ | १४४.५१ | | ४.५० | ४.५० |
| डॉडसन | ११६ | ३१.७८ | (८३.९४) | ३३ | २५.१८ | (७.७५) | २.८५ | ७.९२ | ५.०८ |
| जेएसडब्ल्यू | ६५२ | | (६५१.८०) | ४२४ | १९२.६४ | (२३१.३६) | ६.५१ | | (६.५१) |
| सीजीपीएल | ५,१५८ | २,२१८.१५ | (२,९३९.७४) | १,७४२ | १,६०१.०२ | (१४०.९८) | ३.३८ | ७.२२ | ३.८४ |
| अदानी पॉवर | २०,९८६ | ११,३१४.७१ | (९,६७१.६५) | ८,१६९ | ७,४७३.०१ | (६९५.९९) | ३.८९ | ६.६० | २.७१ |
| एमको पॉवर | १,३७० | १,४८९.२० | ११९.१४ | ७५० | ६३७.९१ | (११२.०९) | ५.४७ | ४.२८ | (१.१९) |
| रतन इंडिया | १,८३१ | ८,९३५.२० | ७,१०४.२७ | १,४१३ | ३,७४३.६९ | २,३३०.६९ | ७.७२ | ४.१९ | (३.५३) |
| साई वर्धा | | १,७८७.०४ | १,७८७.०४ | | ८३०.४७ | ८३०.४७ | | ४.६५ | ४.६५ |
| नुतनशील | ३७,१११ | २९,४७५.६७ | (७,६३५.६९) | १४,३३० | १२,९६५.७५ | (१,३६४.२५) | ३.८६ | ४.४० | ०.५४ |
| व्यापारी | | | - | | - | - | | | - |
| पीजीसीआयएल शुल्क | | | - | ४,०३७ | ४,०३७ | ०.२६ | | | - |
| **एकूण वीज खरेदी** | **१,५३,२०४** | **१,५५,४६९** | **२,२६४** | **६६,८१९** | **७७,४४९** | **१०,६३०** | **४.३६** | **४.९८** | **०.६२** |

## ३. वितरण हानी :-

गेल्या काही वर्षात महावितरणने वितरण हानी कमी करण्यात लक्षणीय यश मिळविले आहे. भविष्यातही महावितरण असेच प्रयत्नशील राहील. हे प्रयत्न चालुच राहतील आणि भविष्यात या प्रयत्नात वाढच होईल. मा. आयोगाने दि. ३० मार्च २०२० च्या

आदेशामध्ये वितरण हानी कमी करण्याचे लक्ष्य (अतिउच्चदाब वीजविक्री आणि मुक्तप्रवेश (Open Acess) वीजविक्री वगळून ) निश्चित केले होते. महावितरणने तेच लक्ष्य प्रस्तावित केले आहे.

| तपशील | आ.व. २०२३-२४ | आ.व. २०२३-२४ | आ.व. २०२४-२५ | आ.व. २०२४-२५ |
|---|---|---|---|---|
| | मंजूर | प्रस्तावित | मंजूर | प्रस्तावित |
| वितरण हानी- (अति उच्चदाब आणि मुक्तप्रवेश वीजविक्री वगळून ) | १३.०% | १३.०% | १२.०% | १२.०% |

## ४. वायर व पुरवठा व्यवसायाचे विलगीकरण :-

बहुवर्षिय वीजदर विनियम २०१९, कलम ७१ अन्वये एकुण वार्षिक महसुली गरजेचे वायर व पुरवठा या व्यवसायांमध्ये विलगीकरण करण्याबाबत प्रावधान करण्यात आलेले आहे.

महावितरणने विनियमांतील तरतुदींनुसार (वार्षिक महसुली गरजेच्या) विविध घटकांचे वायर व पुरवठा असे विलगीकरण केलेले आहे.

## ५. आ. व. २०२३-२४ ते आ. व. २०२४-२५ या कालावधी साठी एकूण वार्षिक महसुली गरज :-

आ.व. २०२३-२४ ते आ.व. २०२४-२५ या कालावधी साठी एकूण वार्षिक महसुली गरज ही विविध घटकांच्या अंदाजानुसार व बहुवर्षिय वीजदर विनियम २०१९ च्या तरतुदी नुसार प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच मंजूर वीज दरानुसार वीज विक्री केल्यास मिळणारा महसुल व निर्माण होणारी महसुली तुट वर्षनिहाय प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**रु. कोटी मध्ये**

| तपशील | आ.व. २०२३-२४ | आ.व. २०२३-२४ | आ.व. २०२४-२५ | आ.व. २०२४-२५ |
|---|---|---|---|---|
| | मंजूर | प्रस्तावित | मंजूर | प्रस्तावित |
| वीज खरेदी खर्च | ६४,५५४.९२ | ७५,१६८.०९ | ६६,८१९.६० | ७७,४४८.७० |
| संचलन व सुव्यवस्थेवरील खर्च | ७,८२४.८७ | ८,३८२.६९ | ८,१२४.८७ | ८,८०६.७८ |
| घसारा खर्च | ३,१२२.४५ | ३,०८०.११ | ३,१८३.८२ | ३,३०८.७३ |
| कर्ज भांडवला वरील व्याज | ८९३.८८ | ९३४.९७ | ६५९.०४ | १,११६.०० |
| खेळत्या भांडवला वरील व्याज | १४५.६९ | १३८.३५ | १४५.६४ | १६३.३५ |
| ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ६२५.७९ | ४६०.०० | ६५७.०८ | ४८३.०० |
| अन्य वित्त खर्च | - | - | - | - |
| बुडीत व साशंक रक्कमेसाठीची तरतुद | ७३२.६३ | १,१११.०६ | ७३२.६३ | १,१६५.८० |
| अन्य खर्च | ६०.८७ | ३२९.८० | ६३.९१ | ३४६.२९ |
| प्राप्ती कर | - | - | - | - |
| पारेषण अनुज्ञप्तीधारकांस प्रदान केलेला पारेषण आकार व म.रा.भार प्रेषण केंद्राचे शुल्क तथा आकार | ६,००९.५१ | ६,००९.५१ | ६,०३६.७७ | ६,०३६.७७ |
| प्रोत्साहन /सवलत | ३७३.२० | ३८५.७३ | ३९१.८६ | ४०५.०२ |
| आकस्मिक राखीव निधीचे योगदान | १८५.३५ | १७४.०६ | १९०.५७ | २००.२२ |
| ओपेक्स योजना (opex scheme) | ११०.४९ | ६५२.५१ | ११०.४९ | २,३६७.१२ |
| भाग भांडवलावरील परतावा | २,३३४.२८ | १,९७६.२७ | २,३९८.०४ | १,९९२.४१ |
| अतिरिक्त पुरवठा आकार परतावा | - | १८०.०० | - | १८०.०० |
| नफा/तोटा वितरणाचा परिणाम खर्च | - | - | - | - |
| अधिक : पुढील वर्षांसाठी MPECS ला केलेल्या प्रदानाचा परिणाम | २८.१३ | २८.१३ | २१.१४ | २१.१४ |
| वाढीव वीज वापरासाठीची सवलत | ४२६.४५ | ४२६.४५ | ५४८.७७ | ५४८.७७ |
| **एकुण महसूली गरज** | **८७,४२८.५०** | **९९,४३७.७४** | **९०,०८४.२३** | **१,०४,५९०.१०** |
| मा. आयोगाच्या आदेशानुसार स्थिरीकरण रक्कम | ५,५८५.०० | ५,५८५.०० | ७,०१७.०० | ७,०१७.०० |
| **निव्वळ एकूण महसुली गरज** | **९३,०१३.५०** | **१,०५,०२२.७४** | **९७,१०१.२३** | **१,११,६०७.१०** |
| वजा | | | | |
| वीजदरां व्यतिरिक्त उत्पन्न | ४३९.६० | ३३३.८६ | ४६१.५९ | ३५०.५५ |
| ओपन ॲक्सेस चार्जेस पासुनचे उत्पन्न | २१४.७६ | २१४.७६ | २१६.६० | २१६.६० |
| अतिरिक्त वीज विक्रीतून मिळणारा महसुल | ३६३.०२ | - | ३८६.३० | - |
| वहन आकारातून मिळणारे उत्पन्न | - | - | - | - |
| अतिरीक्त अधिभारातून मिळणारे उत्पन्न | ११२.६३ | ११२.६३ | १०९.४६ | १०९.४६ |
| **निव्वळ एकूण महसुली गरज** | **९१,८८३.४९** | **१,०४,३६१.४९** | **९६,९२७.२८** | **१,१०,९३०.४९** |
| वीज विक्रीतून मिळणारा एकुण महसुल | **९१,८८३.००** | ९०,४२२.१६ | ९५,९२७.०० | ९२,३५४.५८ |
| ठोक वीज पुरवठा मिळणारा एकुण महसुल | - | - | - | - |
| वायर  व्यवसायतून मिळणारा एकुण महसुल | - | - | - | - |
| **महसुलातील तुट / (आधिक्य)** | **०.४९** | **१३,९३९.३४** | **०.२८** | **१८,५७५.९०** |

**ग) अतिरीक्त दावे :-**

मा. आयोगाने महावितरणच्या दि. ३० मार्च २०२० रोजीच्या (२०१९ चे प्र.क्र. ३२२) बहुवर्षिय वीजदर आदेशा विरुध्द दाखल केलेल्या महावितरणच्या पुर्नविलोकन याचिकेवर दि. ३० जून २०२० च्या आदेशात (२०२० चे प्र.क्र. ८४) काही दाव्यासह विशिष्ट खर्च मंजूर केले आहेत. महावितरणने आयोगाद्वारे सदर आदेशातील मंजुर खर्चाची मागणी खालील प्रमाणे केली आहे.

| **तपशिल** | **रक्कम (रु. कोटी मध्ये )** |
|---|---|
| पुर्नविचार आदेशाचा परिणाम | २४७.४४ |
| **एकूण** | **२४७.४४** |

**ह) धारण खर्च (कॅरींग कॉस्ट) :-**

मा. आयोग महसूलातील तुट/अतिरिक्त खर्चावरील वरील धारण खर्चास मान्यता देत असते. त्यानुसार महावितरणने वसुल न झालेली तुट, आणि पुर्नविचार याचिकेतील आदेशाचा परिणाम यांच्या वरील धारण खर्चाची गणना केलेली आहे.

**इ) विजदरामार्फ़त एकूण महसुलाची गरज :-**

आ.व. २०१९-२० ते आ.व २०२१-२२ साठीची महसूलातील तुट, पुर्नविचार याचिके वरील (प्र.क्र. ८४/२०२०) आदेशाचा परिणाम, धारण खर्च, आ. व. २०२३-२४ ते आ.व. २०२४-२५ करीताची अंदाजित महसूलातील तुट यांचा विचार करुन खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार **रु. ६७.६४४** कोटी ची वसुली वीजदर वाढीतुन होईल अशी गणना केली आहे.

| तपशिल | रक्कम (रु. कोटी मध्ये ) |
|---|---|
| आ.व. १९-२० च्या अंतिम अचुक समायोजनापोटी महसुलाची गरज | ११,५१६ |
| आ.व. २०-२१ च्या अंतिम अचुक समायोजनापोटी महसुलाची गरज | ५,९३२ |
| आ.व. २१-२२च्या तत्पुरते समायोजनापोटी महसुलाची गरज | ८,१५१ |
| आ.व. २०२२-२३ करिताची प्रस्तावित महसुली तुट | ५४८ |
| आ.व. २०२३-२४ करिताची प्रस्तावित महसुली तुट | १३,९३९ |
| आ.व. २०२४-२५ करिताची प्रस्तावित महसुली तुट | १८,५७६ |
| बहुवर्षिय वीजदर आदेशावरील पुर्नविचार आदेशाचा परिणाम | २४७ |
| पुर्वीच्या महसुली तुटीचा वसुली खर्च (कॅरींग कॉस्ट) / परिणाम आणि नियंत्रण कालावधीतील वसुल न केलेली महसुली तुट | ८,७३४ |
| **बहूवर्षिय विजदर कालावधीकरीताची एकुण महसुली तुट** | **६७,६४४** |
| **एकूण वसुली** | **६७,६४४** |

**ज ) विजदर संरचना :-**

महावितरण येथे असे नमूद करु इच्छिते की, कंपनीचे कार्य सुरळीत राहण्याकरीता ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवेचा संपूर्ण खर्च वेळेत वसुल होणे गरजेचे आहे. विद्युत अधिनियम २००३, बहुवर्षिय वीजदर विनीयम व राष्ट्रीय वीजदर धोरणाप्रमाणे मा. आयोग ग्राहकांचे वीजदर ठरवित असते. मा. आयोगाने कार्यक्षमता, अर्थव्यवस्था, प्रभावी कार्यपद्धती तसेच वीज ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा वाढावा याकरीता सतत प्रोत्साहन दिलेले आहे. महावितरणची आर्थिक परिस्थिती सुस्थितीत राहण्यासाठी याच तत्वाचा पुढेही अवलंब करण्यात यावा, अशी विनंती महावितरण मा. आयोगास करत आहे.

महावितरणने प्रस्तावित केलेली वीजदर संरचना ही पुढील तत्वांवर आधारीत आहे.

- स्थिर आकाराव्दारे स्थिर खर्चाची परिपूर्तता करण्यासाठी स्थिर आकाराचे सुसूत्रीकरण.
- वीज देयक भरणा शिस्तिशी संलग्न असणाऱ्यांना विद्यमान सवलती चालू ठेवणे.
- प्रिपेड मीटर सवलतीच्या तरतुदीमध्ये सुधारणा.
- धनादेश (Cheque) संबंधित.
- लघुदाब ६ मधील - लघुदाब पथदिवे या ग्राहक वर्गवारीसाठी मागणी आकाराच्या तरतुदीमध्ये सुधारणा.
- मा. आयोगाने मंजूर केलेल्या विविध सवलती / प्रोत्साहने मिळविण्याची पात्रता.

- वीजदर प्रायोज्यतेशी संबंधित सूचना.
- शुल्क वेळापत्राची (Schedule of Charges) सुधारणा.
- नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित केलेल्या मुक्तप्रवेश (Open Access) ग्राहकांसाठी राष्ट्रीय वीजदर धोरणातील सूत्रानुसार कोणत्याही कमाल मर्यादेशिवाय क्रॉस सबसिडी अधिभाराची वसुली आणि वहन आकार व वहन हानीची वसूली.
- मुक्तप्रवेश ग्राहकांना अतिरिक्त अधिभार लागू करणे.

**क) विजदर पुनरावलोकनाची तर्कमिमांसा :-**

महावितरणची महसुली तुट भरुन काढण्याकरीता महावितरण विविध वर्गवारीच्या स्थिर आकार व वीज आकारामध्ये वाढ करण्याचे प्रस्तावित करीत आहे. सदर दरवाढ ही देश पातळीवर असणाऱ्या महागाई निर्देशांक तसेच वीज खरेदी खर्चातील वाढ, देशांतर्गत कोळशाच्या तुटवडयामुळे होणारे कोळश्यातील मिश्रण (coal blending) कायादयांतील बदलांमुळे होणारे खर्च, MSPGCL आणि PGCIL च्या खर्चात वाढ, NPCIL च्या वीजदरांतील सुधारणा, ग्राहक मिश्रणातील बदल आणि त्याचा महसुलावर होणारा परिणाम इ. मुळे होणाऱ्या वाढीव खर्चाची पूर्तता करण्यासाठी महावितरणाची किमान गरज आहे.

**ल) क्रॉस सबसिडी अधिभार-**

विद्युत कायदयामधील कलम २ (४७) च्या "मुक्त प्रवेश" व्याख्येनुसार, तसेच कलम ४२ नुसार क्रॉस सबसिडी अधिभार, अतिरिक्त अधिभार व इतर लागू असलेल्या आकारांची भरणा करण्याऱ्या, पात्र असणाऱ्या ग्राहकास वितरण परवाना धारकाने मुक्त प्रवेश देणे बंधनकारक आहे.

विद्युत कायदा २००३ च्या कलम ४२ (२) नुसार क्रॉस सबसिडी अधिभार हा सद्यपातळीवरील क्रॉस सबसिडीवर आधारित असावा. त्यामुळे ज्या ग्राहकांनी मुक्त प्रवेश घेतलेला आहे, अशा ग्राहकांना सद्यपातळीवरील क्रॉस सबसिडीच्या भरपाईपोटी आकार आकारण्यात यावा जेणेकरुन त्याकाळासाठीचा भार वितरण परवानाधारकाच्या ग्राहकांवर पडू नये.

त्यानुसार महावितरणने सुधारित राष्ट्रीय वीजदर धोरणामध्ये नमूद केलेल्या सुत्रानुसार परंतु कुठलीही मर्यादा न लावता क्रॉस सबसिडी अधिभाराची गणना केली आहे. उदाहरणा दाखल उच्चदाब औद्योगिक ग्राहकांसाठी गणना केलेला क्रॉस सबसिडी अधिभार खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

**रु. / के.व्हि.ए.एच**

| ग्राहक वर्गवारी | आ.व. २०२३-२४ | आ.व. २०२४-२५ |
|---|---|---|
| **उच्चदाब १ उच्चदाब औद्योगिक** | | |
| उच्चदाब | ४.५३ | ५.८० |
| अतिउच्चदाब | ४.९६ | ६.२३ |

**म) वहन आकार**

मा. आयोगाने बहुवर्षिय वीजदर अधिनियम २०१९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे महावितरणने उच्चदाब (अति उच्चदाब वगळून) आणि लघुदाब या पातळीकरीता प्रस्तावित केलेल्या वहन आकाराचा सारांश खाली दिलेल्या तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

**रु / युनिट**

| तपशील | एकक | आ.व. २०२३-२४ | आ.व. २०२४-२५ |
|---|---|---|---|
| उच्च दाब (अति उच्चदाब वगळून) | रु./के.व्हि.ए.एच | ०.७४ | ०.७४ |
| लघुदाब | (रु./के.डब्ल्यु.एच) | १.४३ | १.४४ |

वाणिज्यिक तोडग्याच्या हेतू करीता पूर्वीच्या वीजदर आदेशात मंजूर केलेली वहन हानी महावितरण पुन्हा प्रस्तावित करत आहे.

**न) अतिरिक्त अधिभार-**

जे ग्राहक ठरवून दिलेल्या वितरण परवानाधारकाव्यतिरीक्त इतर व्यक्तींकडून वीज घेत असतील अशा ग्राहकांना अतिरीक्त अधिभार लावण्याचे प्रावधान कलम ४२ (४) मध्ये आहे. मा. आयोगाच्या वितरण मुक्त प्रवेश विनीयम, २०१६ मधील विनीयम १४.८ मध्ये अतिरीक्त अधिभार ठरविण्याची तत्वे आणि तो लागू करण्याबाबत अधोरेखीत केलेले आहे.

| तपशिल | आ.व. २०२३-२४ | आ.व. २०२४-२५ |
|---|---|---|
| प्रस्तावित अतिरिक्त अधिभार (रु./ युनिट) | १.४२ | १.४० |

**ओ) वीजदराची प्रयोज्यता (ॲप्लीकॅबीलीटी)-**

प्रत्येक ग्राहकांच्या वीजदरांची प्रयोज्यता ही ग्राहकांचा वीज वापर, वीज वापराचा हेतु, ग्राहक वर्गवारी इ. बाबींवर अवलंबुन असते. याप्रमाणे मा. आयोगाने ग्राहकांचा विद्युत पुरवठा (लघुदाब अथवा उच्चदाब), वापराचा हेतू (घरगुती, बिगर- घरगुती, औद्योगिक, शेती इत्यादी.) यानुसार ग्राहक वर्गवारी केलेली आहे.

महावितरणने सदर विषयाचा सखोल अभ्यास करुन तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी विचार विनिमय करुन शक्य तितक्या प्रमाणात सर्व समावेशक वीजदर प्रयोज्यता प्रस्तावित करण्याचा प्रयत्न केला आहे.

**पी) वीजदर पत्रक :-**

वर्गवारी / उपवर्गवारीनुसार सध्याचे आणि प्रस्तावित वीज आकार (वहन आकार वगळून) याचा तुलनात्मक तपशील खालील तक्त्यात दर्शविला आहे.

## उच्चदाब प्रवर्गाकरीता विद्यमान व प्रस्तावित विद्युत आकाराचा (वहन आकार वगळून) तुलनात्मक तक्ता

| तपशिल | विद्यमान वीजदर (इंधन समायोजन आकारासह) (रु./के.व्ही.ए.एच) | आ.व. २०२३-२४ विद्युत आकार (रु./के.व्ही.ए.एच ) | | आ.व. २०२४ -२५ विद्युत आकार (रु./ के.व्ही.ए.एच ) | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रस्तावित वीजदर | आ.व. २०२२-२३ साठी मंजूर दराच्या तुलनेत बदल टक्केवारीमध्ये | प्रस्तावित वीजदर | आ.व. २०२३-२४ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत बदल टक्केवारीमध्ये |
| **उच्चदाब-१ (अ) :- औद्योगिक (सामान्य)** | | | | | |
| **उच्चदाब** | ८.२४ | ९.३२ | १३% | १०.५० | १३% |
| **अतिउच्चदाब** | ८.२४ | ९.३२ | १३% | १०.५० | १३% |
| **उच्चदाब-१ (ब) :- औद्योगिक (हंगामी)** | | | | | |
| **उच्चदाब** | ८.५५ | ९.७० | १३% | १०.९० | १२% |
| **अतिउच्चदाब** | ८.४० | ९.५० | १३% | १०.६० | १२% |
| **उच्चदाब -२ :- वाणिज्यिक** | | | | | |
| **उच्चदाब** | १३.१५ | १४.८० | १३% | १६.६० | १२% |
| **अतिउच्चदाब** | १३.१० | १४.८० | १३% | १६.६० | १२% |
| **उच्चदाब -३ :- रेल्वे / मोनो रेल्वे / मेट्रो** | | | | | |
| **उच्चदाब** | ७.६६ | ८.७० | १४% | ९.८० | १३% |
| **अतिउच्चदाब** | ८.२१ | ८.७० | ६% | ९.८० | १३% |
| **उच्चदाब -४ :- सार्वजनिक पाणीपुरवठा** | | | | | |
| **उच्चदाब** | ७.४२ | ८.४० | १३% | ९.४० | १२% |
| **अतिउच्चदाब** | ७.३७ | ८.४० | १४% | ९.४० | १२% |
| **उच्चदाब -५ (अ) :- कृषीपंप** | | | | | |
| **उच्चदाब** | ४.३४ | ४.८० | ११% | ५.३० | १०% |
| **अतिउच्चदाब** | ४.३४ | ४.८० | ११% | ५.३० | १०% |
| **उच्चदाब -५ (ब) :- कृषी - इतर** | | | | | |
| **उच्चदाब** | ६.१० | ६.१० | ०% | ६.७० | १०% |
| **अतिउच्चदाब** | ६.१० | ६.१० | ०% | ६.७० | १०% |
| **उच्चदाब - ६ :- एकगठ्ठा पुरवठा (रहिवासी)** | | | | | |
| **उच्चदाब** | ६.७० | ७.६० | १३% | ८.६० | १३% |
| **अतिउच्चदाब** | ६.८० | ७.६० | १२% | ८.६० | १३% |
| **उच्चदाब - ८(अ) :- सार्वजनिक सेवा (शासकीय)** | | | | | |
| **उच्चदाब** | ८.८९ | १०.१० | १४% | ११.३० | १२% |
| **अतिउच्चदाब** | ९.२४ | १०.१० | ९% | ११.३० | १२% |
| **उच्चदाब -८(ब):- सार्वजनिक सेवा (इतर)** | | | | | |
| **उच्चदाब** | १०.७१ | १२.१० | १३% | १३.७० | १३% |
| **अतिउच्चदाब** | १०.६१ | १२.१० | १४% | १३.७० | १३% |
| **उच्चदाब -९ :- वीजेवर चालणा-या वाहनांकरीता चार्जिग स्टेशन/ सेंटर्स** | | | | | |
| **उच्चदाब** | ५.८० | ६.१० | ५% | ६.४० | ५% |
| **अतिउच्चदाब** | ५.९५ | ६.२५ | ५% | ६.६० | ६% |

## लघुदाब प्रवर्गाकरीता विद्यमान व प्रस्तावित विद्युत आकाराचा (वहन आकार वगळून) तुलनात्मक तक्ता (१/२)

| तपशिल | विद्यमान वीजदर (इंधन समायोजन आकारासह) (रु./युनिट) | आ.व. २०२३-२४ विद्युत आकार (रु./युनिट) | | आ.व. २०२४-२५ विद्युत आकार (रु./युनिट) | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रस्तावित वीजदर | आ.व. २०२२-२३ साठी मंजूर दराच्या तुलनेत बदल टक्केवारीमध्ये | प्रस्तावित वीजदर | आ.व. २०२३-२४ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत बदल टक्केवारीमध्ये |
| **लघुदाब १ :- लघुदाब घरगुती** | | | | | |
| लघुदाब १ (अ)- घरगुती- बीपीएल | १.४१ | १.५३ | ९% | १.७० | ११% |
| लघुदाब १ (ब)- घरगुती | | | | | |
| ०-१०० युनिटस् | ४.०१ | ४.५० | १२% | ५.१० | १३% |
| १०१-३०० युनिटस् | ८.७९ | १०.०० | १४% | ११.५० | १५% |
| ३०१-५०० युनिटस् | १२.४२ | १४.२० | १४% | १६.३० | १५% |
| > ५०० युनिटस् (उर्वरीत युनिट वापराकरीता ) | १४.२१ | १६.३० | १५% | १८.७० | १५% |
| **लघुदाब २ :- बिगर घरगुती** | | | | | |
| (अ) ० - २० के.डब्ल्यु.पर्यंत | ८.४७ | ९.६० | १३% | ११.०० | १५% |
| (ब) > २० के.डब्ल्यु..आणि ≤ ५० के.डब्ल्यु. | १२.९४ | १४.९० | १५% | १७.१० | १५% |
| (क) > ५० के.डब्ल्यु. | १५.३१ | १७.४० | १४% | २०.०० | १५% |
| **लघुदाब ३ :- सार्वजनिक पाणी पुरवठा आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्र** | | | | | |
| (अ) ० -२० के.डब्ल्यु. पर्यंत | २.९८ | ३.४० | १४% | ३.९० | १५% |
| (ब) > २० के.डब्ल्यु. आणि ≤ ४० के.डब्ल्यु. | ४.५९ | ५.३० | १५% | ६.१० | १५% |
| (क) > ४० के.डब्ल्यु. | ६.०९ | ७.०० | १५% | ८.०० | १४% |
| **लघुदाब (४) :- कृषी** | | | | | |
| **लघुदाब ४ (अ) :- कृषि- मीटर नसलेले पंप** | **रु./एचपी / महिना** | | | **रु./एचपी / महिना** | |
| प्रवर्ग १ (वार्षिक १३१८ तास/अ.श./ वर्ष पेक्षा जास्त वापराचे प्रमाण असलेली परिमंडळे) | | | | | |
| (अ) ०-५ अ. श. पर्यंत | ३७९ | ४३५ | १५% | ५०० | १५% |
| (ब) ५ अ. श. पेक्षा जास्त - ७.५ अ. श. पर्यंत | ४०७ | ४७० | १५% | ५४० | १५% |
| (क) ७.५ अ. श. पेक्षा जास्त | ४५५ | ५२५ | १५% | ६०५ | १५% |
| प्रवर्ग २ (वार्षिक १३१८ तास /अ.श./ वर्ष पेक्षा कमी वापराचे प्रमाण असलेली परिमंडळे) | | | | | |
| (अ) ०-५ अ. श. पर्यंत | २८७ | ३३० | १५% | ३८० | १५% |
| (ब) ५ अ. श. पेक्षा जास्त - ७.५ अ. श. पर्यंत | ३१९ | ३६५ | १४% | ४२० | १५% |
| (क) ७.५ अ. श. पेक्षा जास्त | ३६७ | ४२० | १४% | ४८५ | १५% |
| **लघुदाब ४ (ब) :- कृषि - मीटर असलेले - पंप** | २.३५ | २.७० | १५% | ३.१० | १५% |
| **लघुदाब ४ (क) :- कृषि - मीटर असलेले - इतर** | ३.९४ | ४.५० | १४% | ५.१० | १३% |

## लघुदाब प्रवर्गाकरीता विद्यमान व प्रस्तावित विद्युत आकाराचा (वहन आकार वगळून) तुलनात्मक तक्ता (२/२)

| तपशिल | विद्यमान वीजदर (इंधन समायोजन आकारासह) (रु. / युनिट) | आ.व. २०२३-२४ | | आ.व. २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|
| | | विद्युत आकार (रु./युनिट). | | विद्युत आकार (रु./युनिट) | |
| | | प्रस्तावित वीजदर | आ.व. २०२२-२३ साठी मंजूर दराच्या तुलनेत बदल टक्केवारीमध्ये | प्रस्तावित वीजदर | आ.व. २०२३-२४ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत बदल टक्केवारीमध्ये |
| **लघु दाब ५: - उद्योग** | | | | | |
| (i) ० -२० के.डब्ल्यु. पर्यंत | ६.११ | ६.९० | १३% | ७.९० | १४% |
| (ii) २० के.डब्ल्यु.पेक्षा जास्त | ७.२५ | ८.२० | १३% | ९.४० | १५% |
| **लघुदाब ६: -पथदिवे** | | | | | |
| (अ) ग्रामपंचायत अ, ब आणि क श्रेणीच्या नगरपालिका | ६.१० | ७.०० | १५% | ८.०० | १४% |
| (ब) महानगरपालिका | ७.४६ | ८.६० | १५% | ९.९० | १५% |
| **लघुदाब ७ :- (अ) सार्वजनिक सेवा-शासकिय** | | | | | |
| (i) ≤ २० के.डब्ल्यु. | ३.८३ | ४.४० | १५% | ५.०० | १४% |
| (ii): > २०- ≤ ५० के.डब्ल्यु. | ५.४७ | ६.३० | १५% | ७.२० | १४% |
| (iii): > ५० के.डब्ल्यु. | ६.८८ | ७.९० | १५% | ९.०० | १४% |
| **लघुदाब ७: - (ब) सार्वजनिक सेवा (इतर)** | | | | | |
| (i) ≤२० के.डब्ल्यु. | ५.४७ | ६.३० | १५% | ७.२० | १४% |
| (ii): > २०- ≤ ५० के.डब्ल्यु. | ८.६८ | १०.०० | १५% | ११.५० | १५% |
| (iii): > ५० के.डब्ल्यु. | ८.९९ | १०.३० | १५% | ११.८० | १५% |
| **लधुदाब ८: - वीजेवर चालणा-या वाहनांकरीता चार्जिग स्टेशन/सेंटर्स** | ५.०० | ५.२० | ४% | ५.४० | ४% |

## उच्चदाब प्रवर्गाकरीता विद्यमान व प्रस्तावित स्थिर आकाराचा तुलनात्मक तक्ता

| तपशिल | विद्यमान स्थिर आकार (रु./केव्हिए /महिना ) | आ.व. २०२३ -२४ स्थिर आकार (रु. / केव्हिए / महिना ) | | आ.व. २०२४ -२५ स्थिर आकार (रु. / केव्हिए / महिना ) | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रस्तावित वीजदर | आ.व. २०२२ -२३ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत बदल टक्केवारीमध्ये | प्रस्तावित वीजदर | आ.व. २०२३ -२४ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत बदल टक्केवारीमध्ये |
| **उच्चदाब-१ (अ) :- औद्योगिक** | | | | | |
| **उच्चदाब, अतिउच्चदाब** | ४५४ | ५१० | १२% | ५७२ | १२% |
| **उच्चदाब-१ (ब) :- औद्योगिक (हंगामी)** | | | | | |
| **उच्चदाब, अतिउच्चदाब** | ४५४ | ५१० | १२% | ५७२ | १२% |
| **उच्चदाब-२ :- वाणिज्यिक** | | | | | |
| **उच्चदाब, अतिउच्चदाब** | ४५४ | ५१० | १२% | ५७२ | १२% |
| **उच्चदाब -३ :- रेल्वे / मोनो रेल्वे / मेट्रो** | | | | | |
| **उच्चदाब, अतिउच्चदाब** | ४५४ | ५१० | १२% | ५७२ | १२% |
| **उच्चदाब -४:- सार्वजनिक पाणीपुरवठा** | | | | | |
| **उच्चदाब, अतिउच्चदाब** | ४५४ | ५१० | १२% | ५७२ | १२% |
| **उच्चदाब -५ (अ) :- कृषीपंप** | | | | | |
| **उच्चदाब, अतिउच्चदाब** | ८० | ८९ | ११% | १०० | १२% |
| **उच्चदाब -५ (ब) :- कृषी - इतर** | | | | | |
| **उच्चदाब, अतिउच्चदाब** | ८० | ८९ | ११% | १०० | १२% |
| **उच्चदाब - ६ :- एकगठ्ठा पुरवठा (रहिवासी)** | | | | | |
| **उच्चदाब, अतिउच्चदाब** | ३६२ | ४०६ | १२% | ४५५ | १२% |
| **उच्चदाब - ८ (अ) :- सार्वजनिक सेवा (शासकीय)** | | | | | |
| | | | | | |
| **उच्चदाब, अतिउच्चदाब** | ४५४ | ५१० | १२% | ५७२ | १२% |
| **उच्चदाब - ८ (ब) :- सार्वजनिक सेवा (इतर)** | | | | | |
| **उच्चदाब, अतिउच्चदाब** | ४५४ | ५१० | १२% | ५७२ | १२% |
| **उच्चदाब -९ :- वीजेवर चालणा-या वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन/ सेंटर्स** | | | | | |
| **उच्चदाब, अतिउच्चदाब** | ७० | ७६ | ९% | ८४ | ११% |

## लघुदाब प्रवर्गाकरीता विद्यमान व प्रस्तावित स्थिर आकाराचा तुलनात्मक तक्ता (१/२)

| तपशिल | एकक | विद्यमान स्थिर आकार | आ.व. २०२३-२४ | | आ.व. २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्थिर आकार | | स्थिर आकार | |
| | | | प्रस्तावित वीजदर | आ.व. २०२२-२३ साठी मंजूर दराच्या तुलनेतबदल टक्केवारीमध्ये | प्रस्तावित वीजदर | आ.व. २०२३-२४ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत बदल टक्केवारीमध्ये |
| **लघुदाब १:- लघुदाब घरगुती** | | | | | | |
| लघुदाब १ (अ):-घरगुती बीपीएल | रु./जोडणी /महिना | २८ | ३२ | १४% | ३६ | १३% |
| लघुदाब १ (ब) :- घरगुती | | | | | | |
| ०-१०० युनिटस् | रु./जोडणी /महिना | १०५ | ११८ | १२% | १३२ | १२% |
| १०१-३०० युनिटस् | रु./जोडणी /महिना | १०५ | ११८ | १२% | १३२ | १२% |
| ३०१-५०० युनिटस् | रु./जोडणी /महिना | १०५ | ११८ | १२% | १३२ | १२% |
| > ५०० युनिटस् | रु./जोडणी /महिना | १०५ | ११८ | १२% | १३२ | १२% |
| ३ फेज जोडणी | रु./जोडणी /महिना | ३५० | ३९३ | १२% | ४३९ | १२% |
| **लघुदाब २:- बिगर घरगुती** | | | | | | |
| (अ) ० - २० केडब्ल्यु पर्यंत | रु./जोडणी /महिना | ४२७ | ४८० | १२% | ५३८ | १२% |
| (ब) >२० केडब्ल्यु आणि ≤५० केडब्ल्यु | रु./केव्हीए/महिना | ४२७ | ४८० | १२% | ५३८ | १२% |
| (क) > ५० केडब्ल्यु | रु./केव्हीए/महिना | ४२७ | ४८० | १२% | ५३८ | १२% |
| **लघुदाब ३ :- सार्वजनिक पाणी पुरवठा आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्र** | | | | | | |
| (अ) ० - २० केडब्ल्यु पर्यंत | रु./केव्हीए/महिना | १०६ | ११९ | १२% | १३३ | १२% |
| (ब) > २० केडब्ल्यु आणि ≤ ४० केडब्ल्यु | रु./केव्हीए/महिना | १२९ | १४४ | १२% | १६० | ११% |
| (क) > ४० केडब्ल्यु | रु./केव्हीए/महिना | १६० | १७८ | ११% | १९८ | ११% |
| **लघुदाब (४) :- कृषी** | | | | | | |
| **लघुदाब ४ (ब) :- कृषि- मीटर असलेले - पंप** | रु./एचपी / महिना | ४३ | ४७ | ९% | ५१ | ९% |
| **लघुदाब ४ (क) :- कृषि- मीटर असलेले - इतर** | रु./ केडब्ल्यु /महिना | ११७ | १३० | ११% | १४५ | १२% |

## लघुदाब प्रवर्गाकरीता विद्यमान व प्रस्तावित स्थिर आकाराचा तुलनात्मक तक्ता (२/२)

| तपशिल | एकक | विद्यमान स्थिर आकार | आ.व. २०२३-२४ स्थिर आकार प्रस्तावित वीजदर | आ.व. २०२३-२४ स्थिर आकार: आ.व. २०२२-२३ साठी मंजूर दराच्या तुलनेत बदल टक्केवारीमध्ये | आ.व. २०२४-२५ स्थिर आकार प्रस्तावित वीजदर | आ.व. २०२४-२५ स्थिर आकार: आ.व. २०२३-२४ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत बदल टक्केवारीमध्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| **लघु दाब ५ :- उद्योग** | | | | | | |
| (i) ० -२० के.डब्ल्यु. पर्यंत | रु./जोडणी /महिना | ४८२ | ५४२ | १२% | ६०८ | १२% |
| (ii) २० के.डब्ल्यु.पेक्षा जास्त | रु./केव्हीए/महिना | ३२१ | ३६० | १२% | ४०४ | १२% |
| **लघुदाब ६ :- पथदिवे** | | | | | | |
| (अ) ग्रामपंचायत अ, ब आणि क श्रेणीच्या नगरपालिका | रु./केडब्लु/महिना | ११७ | १३१ | १२% | १४७ | १२% |
| (ब) महानगरपालिका | रु./केडब्लु/महिना | ११७ | १३१ | १२% | १४७ | १२% |
| **लघुदाब-७ (अ) : -सार्वजनिक सेवा-शासकिय** | | | | | | |
| (i) ≤ २० के.डब्ल्यु. | रु./जोडणी /महिना | ३५३ | ३९६ | १२% | ४४४ | १२% |
| (ii): > २०- ≤ ५० के.डब्ल्यु. | रु./केव्हीए/महिना | ३५३ | ३९६ | १२% | ४४४ | १२% |
| (iii): > ५० के.डब्ल्यु. | रु./केव्हीए/महिना | ३५३ | ३९६ | १२% | ४४४ | १२% |
| **लघुदाब ७ (ब) :- सार्वजनिक सेवा (इतर)** | | | | | | |
| (i): ≤२० के.डब्ल्यु. | रु./जोडणी /महिना | ३८४ | ४३० | १२% | ४८२ | १२% |
| (ii): > २०- ≤ ५० के.डब्ल्यु. | रु./केव्हीए/महिना | ३८४ | ४३० | १२% | ४८२ | १२% |
| (iii): > ५० के.डब्ल्यु. | रु./केव्हीए/महिना | ३८४ | ४३० | १२% | ४८२ | १२% |
| **लधुदाब ८ :- वीजेवर चालणा-या वाहनांकरीता चार्जिग स्टेशन/सेंटर्स** | रु./केव्हीए/महिना | ७० | ७८ | ११% | ८७ | १२% |

वीजदर संररचनेची तत्वे आणि महावितरणने केलेल्या इतर सूचना लक्षात घेऊन महावितरण मा. आयोगाला वीजदर मंजूर करण्याची विनंती करत आहे.

### (क्यु) सरासरी वीजदर वाढ :-

खालील तक्त्यामध्ये नियंत्रण कालावधीकरीता सरासरी विज दरवाढ नमूद केली आहे.

**रु. कोटी मध्ये**

| तपशील | आ.व. २०२२-२३ मा. आयोगाच्या आदेशातील मंजुर सरासरी देयक दर (इंधन समायोजन आकारासह) | आ.व. २०२३-२४ प्रस्तावित | आ.व. २०२४-२५ प्रस्तावित |
|---|---|---|---|
| सरासरी देयक दर (रु./युनिट) | ७.७९ | ८.९० | ९.९२ |
| **सरासरी देयकातील वर्षागणिक वाढ** | | **१४%** | **११%** |
| | | | |

**(र) प्रार्थना :-**

महावितरण कंपनी सन्माननीय आयोगास आदरपूर्वक प्रार्थना आहे की,

**१.** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षिय वीजदर) विनियम २०१९ च्या तरतुदीनुसार मध्यावधी आढावा याचिका मा. आयोगाने पुढील कार्यवाहीसाठी दाखल करुन घ्यावी.

**२.** महावितरण कंपनीने आर्थिक वर्ष २०१९-२० ते आ.व. २०२४-२५ साठी प्रस्तावित केलेली एकूण महसुलाची गरज व एकूण महसुली तुट इतर दाव्यांसह वसुल करण्यास परवानगी दयावी.

**३.** नियंत्रण कालावधीच्या उर्वरीत वर्षांसाठी महसुली तुटीवरील वसुली खर्चास (Carrying Cost) परवानगी दयावी.

**४.** महावितरणने प्रस्तावित केलेल्या वीजदरांची तत्वे व इतर सुचनांचा विचार करुन महसुली तुटीच्या वसुलीस व वीजदर पत्रकास मंजुरी मिळावी.

**५.** कोव्हिड - १९ कालावधीमध्ये आ.व. २०२०-२१ च्या खेळत्या भांडवलाच्या गरजेवरील व्याजाला मान्यता मिळावी.

**६.** मुक्त प्रवेश ग्राहकांसाठी नियंत्रण कालावधीकरीता प्रस्तावित केलेल्या क्रॉस सबसिडी अधिभार आणि वहन आकार तसेच वहन हानी सह इतर सर्व आकारास मंजूरी मिळावी.

**७.** महावितरणने प्रस्तावित केलेल्या विविध प्रकारच्या उपक्रमांसाठी सुचविलेल्या वर्गीकरणास परवानगी दयावी.

**८.** वार्षिक महसुलाच्या गरजेचा (ARR) भाग म्हणून प्रस्तावित केलेल्या सवलती / प्रोत्साहनांना मान्यता दयावी.

**९.** महावितरणने प्रस्तावित केल्याप्रमाणे सवलत व दंड तर्कसंगत (Rationalize) करण्यास मंजूरी दयावी.

**१०.** महावितरणने प्रस्तावित केलेल्या आकार प्रत्रकाला (Schedule of Charges ) मान्यता दयावी.

**११.** महावितरणने सादर केलेल्या भांडवली खर्चाला (Capex & Capitalization) मंजुरी दयावी.

**१२.** महावितरणने प्रस्तावित केलेल्या ओपेक्स (opex) योजना व त्यावरील खर्चाला मंजुरी दयावी.

**१३.** मा. आयोगास योग्य वाटेल असे कोणतेही सहाय्य मंजुर करावे.

**१४.** मा. आयोगास योग्य वाटेल असे कोणतेही आदेश, प्रकरणातील परिस्थिती तसेच न्याय हितांच्या दृष्टीने देण्यात यावे.

**१५.** कोणतीही चूक / भूल झाली असल्यास ती क्षमापित करावी आणि ती सुधारण्याची संधी देण्यात यावी.

**१६.** सदर विनंती अर्ज सादर कल्र्यास या अर्जात गरज असल्यास वेळोवेळी कोणतीही भर टाकण्यास किंवा त्यात बदल करण्यास तसेच अतिरीक्त माहिती सादर करण्यास परवानगी देण्यात यावी.

सही /-

संचालक (वाणिज्य)
महावितरण